ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal

# तिफण

वर्ष १२ वे अंक १ ला
एप्रिल, मे, जून २०२१



## महामानव
## डॉ. बाबासाहेब आंबेडकर
## अभिवादन विशेषांक

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १२ वे, अंक - पहिला एप्रिल ते जून २०२१

UGC Care Listed Journal
ISSN 2231 - 573X

(भाग—०१)

• संपादक •

**डॉ. शिवाजी हुसे**

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी,
हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद - ४३११०३,
मो. ९४०४०००३९८.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण | पान क्रमांक |
|---|---|---|
| • | शुभेच्छा – प्रा. कार्तिक पाटील | 04 |
| • | शोध महानवाचा : संपादकीय – प्रा. प्रफुल एम राजुरवाडे | 06 |
| 1 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर–युगपुरूष – प्रा.डॉ. प्रमोद मनोहर बोधाने | 12 |
| 2 | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि अस्पृश्य – डॉ. सतिष खरात** | 15 |
| 3 | महाडचा संग्रामः एक पाऊल परिवर्तनाच्या दिशेने – डॉ. दत्तात्रय रामचंद्र डुबल | 21 |
| 4 | स्वतंत्र मजूर पक्ष व खोती पध्दतीचे उच्चाटन– प्रा. डॉ. जयंत रतिराम रामटेके | 24 |
| 5 | डॉ. आंबेडकरांचे कोल्हापुर संस्थानातील अस्पृश्योध्दाराचे काय–डॉ.प्रदीप मोहन कांबळे | 30 |
| 6 | कुटूंब नियोजन आणि लोकसंख्या नियंत्रणाबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार– डॉ. भारती प्रमोद गायकवाड | 34 |
| 7 | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जातीनिर्मुलनविषयक विचार**– प्रा. डॉ. रविंद्र विखार | 40 |
| 8 | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर व अमरावती येथील अंबादेवी मंदिर प्रवेश सत्याग्रह**– प्रा. डॉ. कुसमेंद्र गं. सोनटक्के | 46 |
| 9 | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा खोती पध्दतीविरुध्द लढा**– प्रा.डॉ. म्हात्रे सुभाष | 49 |
| 10 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतकरी व कामगार यांच्या हितासंबंधीचे कार्य– डॉ. बोडखे संजीव सुखलाल | 53 |
| 11 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सामाजिक लोकशाही–**प्रा. कमलाकर शरद इंगळे** | 57 |
| 12 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक न्यायाची प्रासंगिकता– प्रा. डॉ. दशरथ आदे | 60 |
| 13 | महिला सक्षमीकरणाात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान– प्रा.डॉ.संतोष पहारे | 68 |
| 14 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्त्रि मुक्ती– डॉ. राजू पुं. किरमिरे | 74 |
| 15 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदु कोड बिल– प्रा. विजय शामराव कांडलकर | 79 |
| 16 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार व कार्य– डॉ.सुरेश मारूती चव्हाण | 85 |
| 17 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार– प्रा. डॉ. पंकज रघुनाथ देवरे | 89 |
| 18 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार– डॉ. संदिप म. राऊत | 98 |
| 19 | **भारतीय चलन व अर्थव्यवस्थेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान**– डॉ. विद्युल्लता राहुल हांडे | 103 |
| 20 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची आर्थिक दृष्टी– प्रा.डॉ. फरिदा शफीक खान | 110 |
| 21 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जल नियोजन कार्य– चंद्रमणी काशीनाथ भोवते | 114 |
| 22 | दलित नाटक – रंगभूमीची पूर्वपरंपरा व विकास– प्रा. डॉ. प्रफुल्ल तु.बन्सोड | 124 |
| 23 | **डॉ बाबासाहेब .आंबेडकरांची ओजस्वी मराठी लेखन शैली**– | 132 |



# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार व कार्य

**डॉ.सुरेश मारूती चव्हाण**

**भा**रतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबसाहेब आंबेडकर हे जगविख्यात थोर विचारवंत, कायदेपंडित, अर्थतज्ञ,समाजशास्त्रज्ञ संशोधक,इतिहासकार, पत्रकार, समाजसुधारक स्त्रीउद्धारक,दलितांचे कैवारी व शिक्षणतज्ञ म्हणून ओळखले जातात. अधुनिक भारताच्या जडणघडणीत ज्यांनी आपल्या महान कार्याचा ठसा उमटविला त्या मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची गनना करावी लागते. शिक्षणाशिवाय कोणत्याही समाजाची पर्यायाने देशाची उन्नती होत नाही, याची जाणीव असल्याने त्यांनी शिक्षणाच्या कार्याला विशेष महत्व दिले. एवढेच नव्हेतर शिक्षण हे सामाजिक क्रांतीचे प्रभावी साधन असून ते प्रत्येकाने घ्यायलाच हवे असे अग्रही प्रतिपादनही त्यांनी केले. डॉ.बाबासाहेब हे फक्त बोलते सुधारक नव्हते तर करते सुधारकही होते. कारण शिक्षणाचे महत्व पटूवन देताना त्यांनी प्रत्यक्ष शैक्षणिक संस्था स्थापन करून कृतीशील कार्याची जोड दिली. शिका,संघटीत व्हा आणि संघर्ष करा. हा त्यांनी समाजाला दिलेला मूलमंत्र महान शैक्षणिक क्रान्ती घडवून आणण्यास कारणीभूत ठरला. त्यांनी केलेल्या शैक्षणिक कार्यामुळेच भारतीय समाजातील बहुतांशी सर्वच घटक आज शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आलेले दिसून येतात.

**शैक्षणिक विचार व कार्य –**

शिक्षणामुळे माणसाला आपल्या कर्तव्यांची जाणीव होते,शिक्षण हे वघिणीचे दूध आहे. जो पिला तो गुरगुरल्या शिवाय रहाणार नाही. शिक्षणामुळेच व्यक्ती बौध्दिकदृष्टया प्रगल्भ होते. सशक्त होते, चांगले व वाईट यातील फरक कळू लागतो. प्रज्ञा,शील,करूणा, यासारख्या गुणांचा विकास होतो. शिक्षण हाच समाजाच्या सर्वांगींन प्रगतीचा पाया असून शिक्षणाव्दारेच व्यक्तीमध्ये आत्मविश्वास, आत्मसन्मान,आत्मप्रतिष्ठा, आणि शिस्तबध्दता निर्माण होऊन तो स्वयंपूर्ण व आत्मनिर्भर बनतो आणि त्यातूनच समाजाची व देशाची प्रगती होत असते असा अर्थपूर्ण शैक्षणिक विचार डॉ. बाबासाहेबांनी मांडला.

शिक्षण म्हणजे परिवर्तन हे त्यांच्या शैक्षणिक विचारांचे मुख्यसूत्र होते. त्यांच्या मते, व्यक्तीला जाणीव करून देते ते शिक्षण. शिक्षणा अभावी माणूस दुसऱ्याचा गुलाम कसा होतो या विषयी ते म्हणतात की,उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस हीनबल होवून अल्पायुषी होतो. तसेच शिक्षणाच्या

अभावाने तो निर्बुध्द राहिल्यास जीवंतपणी दुसऱ्याचा गुलाम होतो. म्हणजेच प्रत्येक व्यक्तीला त्याच्या स्वतःच्या आणि राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीने शिक्षणाचे महत्त्व काय आहे.याची जाणीव करून देणे म्हणजेच खरे शिक्षणहोय. हा त्यांचा शिक्षण विषयक दृष्टीकोन खऱ्या अर्थाने परिवर्तनशील स्वरूपाचा होता.

माणसांच्या सर्व प्रश्नांची मुळे त्यांच्या अज्ञानात आहेत असे परखडपणे सांगणारे गौतमबुध्द,'विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नितीविना गती गेली, गतीविना वित्त गेले, वित्ताविना शुद्र खचले' इतके अनर्थ एका अविद्येने केले असा विचार मांडणारे महात्मा फुले,शिक्षणाशिवाय माणूस निव्वळ धोंडा असा विचार मांडणारे संत गाडगेबाबा, शुद्रानां सांगण्याजोगा आहे एकच मार्ग हा,शिक्षणाने पशुत्व हारते पहा. असा विचार मांडणाऱ्या सवित्रीबाई फुले, आणि जॉन डयुई यासारखी महान मंडळी डॉ बाबासाहेबांच्या शैक्षणिक कार्यांची आदर्श होती.

शिक्षणहेच समाजपरिवर्तनाचे प्रभावी अस्त्र असून व्यक्तीला सामाजिक आर्थिक,राजकीय,विकास करून घ्यायचा असेल तर शिक्षणा शिवाय अन्य कोणत्याही मार्ग नाही, हजारो वर्षे मानवतेला काळीमा फासणाऱ्या मानवाला अपमानीत करणाऱ्या आणि देशाला पांगळे करणाऱ्या अन्ययी समाजरचनेला उलथवून टाकण्यासाठी शिक्षण या क्रांतीचीच कास धरली पाहिजे. अशी ठाम भूमिकात्यांनी घेतली. डॉ. बाबासाहेबांच्या मते शिक्षणामध्ये ज्ञान आणि प्रज्ञा याचा सुरेख संगम झालेला असतो. केवळ ज्ञान उपयोगाचे नाही तर जे उपयोगी तेच खरे ज्ञान. अशी त्यांची धारणा होती. लोकशाही यशस्वी करायची असेल तर जनता व समाज नैतिक मुल्याधिष्टीत शिक्षणाव्दारे संस्कारित असावा कारण लोकशाहीसाठी सुशिक्षीत समाजाची नितांत गरज असते. या देशात धर्माच्या नावाखाली लादल्या गेलेल्या सामाजिक गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी शिक्षणाशिवाय तारणोपाय नाही. असेही ते स्पष्ट करतात.

स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करताना डॉ. बाबासाहेब आंबडेकर म्हणतात की, ज्ञान किंवा विद्या ही गोष्ट फक्त पुरूषांसाठीच नाही तर स्त्रीयांसाठीही तितकिच महत्त्वाची आहे. पुढची पिढी सुधारायची असेल तर मुलींना शिक्षण दिल्याशिवाय पर्याय नाही.आपण मुलांच्या शिक्षणाबरोबरच मुलींच्या शिक्षणासाठी धडपड केल्यास समाजाची प्रगती आधिक झपाटयाने होईल. स्त्री–पुरुषांनी परस्परांच्या सहवासत राहून नितीमान पध्दतीने सहशिक्षणाचा निःसंशय पुरस्कारही ते करतात.

शाळा व समाज यांचा अतिशय जवळचा संबंध असून शाळा ही केवळ विद्येची शक्तीकेंद्रेच नाहीत तर संस्कार केंद्रेही झाली पाहिजेत, राष्ट्राची सर्वांगीन प्रगती होण्यासाठी प्राथमिक शिक्षण आधिक महत्त्वाचे असून ते सक्तीचे केले जावे म्हणून त्यांनी निकोप प्रयत्न केले. शिक्षणातीला विद्यापीठांची भूमिका स्पष्ट करताना ती फक्त परीक्षा घेणारी संस्था नसावी,तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाधिष्ठीत असावी विद्यापीठातून दिले जाणारे शिक्षण हे समाजभिमुख, विज्ञानानिष्ठ व पक्षपात विरहीत असावे बाबासाहेबांच्या मते शिक्षक हा शैक्षणिक प्रणालीमधील अत्यंत महत्वाचा घटक असून तो निःसंशयपणे विद्यार्थ्यांना संवेदनशील मनाने समजून घेणारा,सुप्त क्षमतांना वावा देणारा, चालण्या बोलण्यातून विद्यार्थ्यांना

प्रेरणा देणारा, जिज्ञासू, व कृतीशील असावा असे त्यांना वाटते होते. शिवाय विद्यार्थ्यांच्या बाबतीतही त्यांनी जबाबदारीचे भान आणणारी ठाम भूमिका मांडली आहे. विद्यार्थ्यांनी आळस न करता अत्यंत चिकाटीने अभ्यास करून भावी जीवनाची पाया भरणी करून आत्मसन्मानाने व आत्मविश्वासाने सुसंस्कृत जीवन जगण्याची दुर्दम्य इच्छा बाळगली पाहीजे.

डॉ. बाळासाहेब आंबेडकरांनी केवळ शैक्षणिक विचार मांडले नाहीत तर ते प्रत्यक्ष कृतीती आणलेले दिसतात. सन 1924 मध्ये त्यांनी बहिस्कृत हितकरनी सभेची स्थापना केली. 1925 मध्ये सोलापूर येथे वसतीगृह सुरू केले.1928 मध्ये डीप्रेस्ड क्लास एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. तर 1945 साली पीपल्स एज्यूकेशन सोसायटीचीस्थापना केली.1946 रोजी मुंबई सिध्दार्थ कॉलेजची,तर 1950 मध्ये औरंगाबाद येथे मिलींद कॉलेजची स्थापना केली. 1953 मध्ये मुंबई येथे सिध्दार्थ,वाणिज्य आणि अर्थशास्त्र विद्यालय स्थापन केले. मराठवाडा विभागासाठी स्वतंत्र विद्यापीठ असावे म्हणून त्यांनी औरंगाबादला विद्यापीठ स्थापण्यास पुढाकार घेतला. पुढे 1958 मध्ये स्थापन झालेल्या औरंगाबाद विद्यापीठास 1994 मध्ये डॉ.बाबासाहेबांचे नांव देण्यात आले. एकूणच बाबासाहेबांनी प्रत्यक्ष शिक्षणाचे रोपटे लावून अत्यंत निष्ठेने विशाल वटवृक्षात रूपांतर केले आज ही त्यांनी स्थापन केलेल्या या शैक्षणिक संस्था वंचितांच्या शैक्षणिक गरजा भागविण्याचे अविश्रांत कार्य करत आहेत.

**सारांश –**

शिक्षण हेच मुलभूत ध्येय मानून आतोनात कष्ट करत परिस्थितीवर मात करून डॉ.बाबासाहेब हे उच्च विद्या विभूषित झाले होते. शिक्षणामुळेच माणसांचा सर्वांना विकास कसा होतो. यांचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजेच बाबासाहेब होय. शिकेल तोच टिकेल हा शिक्षणाचा मूलमंत्र त्यांनी समाजाला दिला. आज 21 शतकात ही शिक्षणाची संकल्पना प्रत्येक्षात उतरविण्यासाठी विविध स्तरावर जे प्रयत्न केले जात आहेत त्याची गरज डॉ.बाबासाहेबांनी तेंव्हाच ओळखली होती. शिक्षणाचे महत्त्व ओळखून त्यांनी शिक्षण तज्ञ म्हणून शिक्षण,शैक्षणिक संस्था,शिक्षण पध्दती,विद्यार्थी,शिक्षक,विद्यापीठ,सरकारी धोरण,या सारख्या विविध पैलूंचा एकत्रित विचार करून प्रेरणादायी शैक्षणिक कार्य केल्याचे दिसून येते. बाबासाहेबांनी आयुष्यभर सातत्याने वाचन,चिंतन,मनन,लेखन व भाषण या व्दारे शिक्षणाप्रती अतिशय तळमळीने समाजाला जागृत करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला.

शतकानुशतके शिक्षणापासून वंचित राहीलेल्या दिनदलितांचा,उध्दार करायचा असेल तर शिक्षणाशिवाय पर्यायी नाही याची जाणीव ठेवून शिक्षणाशिवाय जाती व्यवस्था, अस्पृष्यता, जातीभेद, विषमता, अन्याय, अपमान, गुलामगिरी, या सारख्या, मोठमोठया तटबंध्यावर त्वेषाने हल्ले करून तथाकथित चातुर्वर्ण्य व्यवस्था उध्वस्त केल्याशिवाय सामाजिक समता प्रस्थापित होणार नाही. अशी ठाम भूमिका मांडून त्यांनी शिक्षणाव्दारेच दिनदलितांच्या मनावरील मरगळ झटकून त्यांना जीवन जगण्यास प्रेरित केले. थोडक्यात डॉ.बाबासाहेबांच्या शैक्षणिक कार्यांचा विचार केला असता न्याय,स्वातंत्र,समता आणि बंधुत्व यासारख्या नितीमूल्यांवर आधारलेला समाज सुधारककांच्या स्वप्नांतील आदर्श भारत घडवायचा असेल तर

आपणास डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या शैक्षणिक विचार व कार्याचा आदर्श डोळयासमारे ठेवूनच वाटचाल करायला हवी.

**संदर्भग्रंथ सुची–**


1)अनिल कठारे, फुले शाहू –आंबेडकर,पूनम प्रकाशन औरंगाबाद ,2011

2)धनराज डाघट,डॉ.बाबासाहेब आंबेडकर भाषणे आणि विचार,खंड दोन शिक्षण,साकेत प्रकाशन,नागपूर 2008

3) यशवंत मनोहर,आंबेडकरवादी मराठी साहित्य,भिमरत्न प्रकाशन,नागपूर 1919

4)धंनजय किर, डॉ.बाबासाहेब आंबेडक, पॅप्युलर प्रकाशन,मुंबई 1989,

5)डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचीभाषणे,खंड 18, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्रशासन मुंबई 2002

6)कल्याणकरबा.ह.,डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, महाराष्ट्रराज्य साहित्य आणिसंस्कृती मंडळ मुंबई 1993

7)ज्ञानराज गायकवाड,महामानव डॉ.भिमराव रामजी आंबेडकर,राजवंश प्रकाशन, मुंबई 2007

8)नलिनी पंडीत,आंबेडकर,ग्रंथाली प्रकाशन, मुंबई 1996.

9)लक्ष्मण गायकवाड,डॉ.बाबासाहेब आंबेडकर जीवन व कार्य,साहित्य अकादमी दिल्ली.2013

10)गणेश राऊत,महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास,डायमंड प्रकाशन पुणे, 2009

11)सुवास नाईक,सुरेश चव्हाण,महामानवडॉ.बाबासाहेब आंबेडकर,ज्ञानसूर्यप्रकाशन, कोल्हापूर.2016

12) शंकरराव खरात,डॉ.बाबासाहेब आंबेडकर आत्मकथा,इंद्रायणी साहित्य प्रकाशन पुणे,1987

13)भालचंद्र फडके,डॉ.आंबेडकरांचे समाज चिंतन,मॅजेस्टिक प्रकाशन,मुंबई 1989

14)खैरमोडे चां.भ. डॉ.भिमराव रामजी आंबेडकर अस्पृश्यांचा उध्दारक,सुगावा प्रकाशन,पुणे 1991

15)दैनिक लोकमत,डॉ.सुहास सोनवणे,डॉ.आंबेडकर यांचा विकास विचार दि.14 / 04 / 2012


---


**इतिहास विभाग प्रमुख**
**कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय**
**गडहिंग्लज जि.कोल्हापूर (महाराष्ट्र)**